**सं. फौ.ख.क्र. १४८/२०२१**
**सरकार वि. कृष्णदेव**
**निशाणी ११**

## अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.१ यांची साक्ष

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

**माझे नाव** :– महेश कांतीलाल काळे
**वय** :– ३४ वर्षे, **धंदा** :– नोकरी (कृषी पर्यवेक्षक)
**राहणार** :– करमाळा, ता. करमाळा, जि. सोलापूर

## सरतपासणी अभियोगपक्षातर्फे – श्री. बी.डी. काळे, विद्यमान सहा. सरकारी वकील यांचेमार्फत

**०१.** घटना ही दि. ०९/०२/२०२१ रोजी सकाळी ११.१५ वाजता घडली होती. माझे सहकारी मित्र शाहीर वसंत बनसोडे हे दिघंचीहून आटपाडीकडे दुचाकीवर येत असताना विठलापूरजवळ भवानी नाक्याजवळ त्यांचा अपघात झाला. मी विठलापूर येथे नोकरीस होतो. गावातील लोकांनी मला फोन करुन अपघाताबाबत कळविले. मी अपघातस्थळी गेलो. त्याठिकाण रस्त्याच्याकडेला एक विजेचा खांब होता आणि एका डंपरच्या सहाय्याने मुरुम टाकण्याचे काम सुरु होते. डंपरला समोरच्या बाजूला असलेली डंपींगला एक इलेक्ट्रीक तार अडकेली दिसली. तेथील लोकांचे असे म्हणणे होते की, डंपरद्वारे तुटलेली विद्युत तार रोडवर पडली होती आणि माझे मित्र दुचाकीवरुन येताना त्या विद्युत तारेला अडकून पडले व त्यांच्या डोक्याला गंभीर मार लागला होता. डंपर चालकाच्या चुकीमुळे आणि निष्काळजीपणामुळे सदरचा अपघात झाला होता. त्यानंतर आम्ही शाहीर बनसोडे यांना उपचारकामी ग्रामीण रुग्णालय, आटपाडी येथे आणले होते. त्यानंतर डॉक्टरांनी तपासून त्यांना मृत घोषित केले. त्यानंतर डंपर चालकाविरुध्द तक्रार दाखल केली. आता मला फिर्याद दाखविली. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. फिर्यादला **निशाणी १२** देण्यात येते.

सं. फौ.ख.क्र. १४८/२०२१
सरकार वि. कृष्णदेव
निशाणी ११

**उलटतपास आरोपीतर्फे – श्री. एस.व्ही.पाठक विद्यमान वकील यांच्यामार्फत सुरु**

**०२.** हे म्हणणे खरे आहे की, अपघाताची घटना मी प्रत्यक्ष पाहिली नाही. माझ्या फिर्यादीत मी आटपाडी येथे कृषी सहायक म्हणून कार्यरत होतो हा मजकूर बरोबर आहे. आमची नोकरी फिल्डवर्कशी निगडीत असल्यामुळे आमचा ऑफिसला हजर राहण्याचा आणि ऑफिस सोडण्याची वेळ निश्चित नसते. हे म्हणणे खरे नाही की, आमच्या ऑफिसला रजिस्टर ठेवले जाते ज्यामध्ये ऑफिसला येवून त्यामध्ये नोंद करुन नंतर फिल्डवर्कसाठी जावे लागते. हे म्हणणे खरे नाही की, आमच्या कार्यालयात कृषी सहायक या पदाकरीता हालचाल रजिस्टर ठेवले जाते.

**०३.** हे म्हणणे खरे आहे की, आटपाडी–दिघंची रस्ता दक्षिण–उत्तर चालीचा आहे. हे म्हणणे खरे आहे की, दोन मोठी चारचाकी वाहने सहज जातील असा मोठा रस्ता आहे. हे मला सांगता येणार नाही की, शेतक–यांच्या शेतातून गेलेल्या विद्युत तारामधून विद्युतचा दाब जास्त झाल्यास तारा तुटू शकतात किंवा कसे. हे म्हणणे खरे आहे की, लाईटच्या तारा तुटल्यामुळे शेतातील पिकांचे नुकसान झाले अशा बातम्या वर्तमानपत्रात येत असतात. हे म्हणणे खरे आहे की, लाईटच्या तारा जास्त दाबामुळे तुटत असतात आणि त्यामुळे पिकांचे नुकसान होते.

**०४.** हे म्हणणे खरे नाही की, मी फिर्याद दिल्यानंतर घटनास्थळी पुन्हा गेलो नाही. हे म्हणणे खरे आहे की, लोकांकडून मला जी घटना कळाली ती मी पोलीसांना सांगितली. मी व्यक्तीशः डॉक्टरांना अपघाताची माहिती दिली नव्हती. मी ज्यावेळी तथाकथीत घटनास्थळी गेलो त्यावेळी विज मंडळाची माणसे आली होती असे घडले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, मी अनोळखी चालक–मालक,

**सं. फौ.ख.क्र. १४८/२०२१**
**सरकार वि. कृष्णदेव**
**निशाणी ११**

नाव पत्ता माहित नाही यांच्याविरुध्द तक्रार दिली होती. मी आणि बनसोडे शेतक–यांचे कॉल आल्यानंतर आमचे जाणे–येणे होते. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही दोघे एकत्र जावून शेतक–यांच्या समस्या सोडवित होतो. हे म्हणणे खरे नाही की, मित्राच्या कुटूंबाला नुकसान भरपाईची रक्कम मिळावी म्हणून मी अज्ञात इसमाविरुध्द खोटी तक्रार दाखल केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील संपूर्ण मजकूर खोटा आहे.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्विकृती,
समक्ष,

सही/-
( आर. बी. कुलकर्णी )
सह न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,
आटपाडी

दि. १८/०१/२०२५
आटपाडी.